प्रेसनोट दि.05/07/2020
अट्टल वाहन चोर गुन्हे शाखा युनिट 5 पिंपरी चिंचवड पोलीसांच्या जाळयात.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हदीमध्ये वाढती वाहन चोरी थांबवणे करीता पोलीस आयुक्त मा.श्री संदिप बिष्णोई साो यांनी गुन्हे शाखेस आदेशीत केले होते त्याप्रमाणे श्री.बाळकृष्ण सावंत वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा युनिट 5 पिंपरी चिंचवड यांनी वाहन चोरी व चैन चोरी गुन्हयांस प्रतिबंध होण्याचे अनुषंगाने गुन्हेशाखा युनिट 5 कडील अधिकारी व कर्मचारी यांना आदेशीत करुन पेट्रोलींग करणे करीता एक खास पथक नेमल होते. त्याप्रमाणे स.पो.नि. राम गोमारे व पोलीस कर्मचारी पेट्रोलींग करीत असतांना श्यामसुंदर गुट्टे यांना त्याच्या बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, पिंपरी चिंचवड शहराचे रेकार्डवरील अट्टल वाहनचोर गोविंदस्वामी सेलवराज चेन्नी वय 36 वर्ष हा बिआरटी बस स्टॉप जवळ मुकाई चौक किवळे येथे चोरीचे वाहन घेवुन विकण्याकरिता येणार अशी खात्रीशीर बातमी मिळल्याने स.पो.नि. राम गोमारे यांनी फारुक मुल्ला, नितीन बहीरट, श्यामसुंदर गुटटे, राजकुमार इघारे व भरत माने यांची एक ॲक्शन टिम तयार करुन त्यांना योग्य मार्गदर्शन करुन सदर आरोपीस ताब्यात घेणे करीता सर्व टीम रवाना झाली.

सदरच्या ठिकाणी जावुन गुन्हे शाखा युनिट 5 कडील दोन टिम तयार करुन दबा धरुन बसलो असता आरोपी नामे गोविंदस्वामी सेलवराज चेन्नी हा काळया रंगाच्या मोटार सायकलवर येत असलचे दिसुन आल्याने आम्ही त्यास थांबवण्याचा प्रयत्न केला असता मोटार सायकलसह पळुन जाण्याचा प्रयत्न करु लागला असता त्यास नमुद स्टाफच्या मदतीने पकडुन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव गोविंदस्वामी सेलवराज चेन्नी वय 36 वर्ष रा.साबळेबंधु बिंल्डींग, विश्रांतवाडी जि पुणे असे सांगीतले त्याच्या ताब्यातील मोटार सायकल बाबत विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यास गुन्हे शाखा युनिट 5 पिंपरी चिंचवड येथे घेवुन येवुन विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने त्याचे जवळ मिळुन आलेले हिरो होंडा पॅशन प्रो एम.एच. 14 सी.टी. 5120 हे वाहन दिनांक 01/07/2020 रोजी स्वराज नगरी तळेगाव दाभाडे येथुन चोरी केल्याची कबुली दिली असुन सदर बाबत तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन गु र नं 408/2020 भा.द.वि.कलम 379 प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्यानंतर सदर आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याने त्यास स.पो.नि. राम गोमारे यांनी अटक करुन त्याच्याकडे तपास केला असता त्याने 1) एम.एच. 14 ए.के. 4057 हिरो होंडा कंपणीची (खडकी पो.स्टे.गुरन 275/2020 भादवी कलम 379) 2)एम.एच.12 सी.सी. 8436 हिरो होन्डा स्प्लेंडर (वाकड पोस्टे गुरन 513/2020 भादवी कलम 379) 3)एम.एच.12 डी.जी. 2996 बजाज कंपणीची थ्रिव्हीलर ऑटो रिक्षा काळे रंगाची (भोसरी पोस्टे गुरन 284/2020 भादवी कलम 379)चोरी केल्याचे कबुली दिली असुन त्याचे कडुन तीन मोटार सायकल व एक ऑटो रिक्षा असा एकुण रु 1,40,000/- किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीवर यापुर्वी वेगवेगळया पोलीस स्टेशन मध्ये खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

1. भोसरी पोलीस स्टेशन गुन्हा रजिनंबर 201/2018 भा.द.वी. 379 प्रमाणे
2. भोसरी पोलीस स्टेशन गुन्हा रजिनंबर 285/2018 भा.द.वी. 379,411प्रमाणे
3. भोसरी पोलीस स्टेशन गुन्हा रजिनंबर 338/2018 भा.द.वी. 379प्रमाणे
4. सांगवी पोलीस स्टेशन गुन्हा रजिनंबर 504/2019 भा.द.वी. 379प्रमाणे
5. खडकी पोलीस स्टेशन गुन्हा रजिनंबर 195/2019 भा.द.वी. 406प्रमाणे
6. खडकी पोलीस स्टेशन गुन्हा रजिनंबर 159/2019 भा.द.वी. 379प्रमाणे
7. विश्रांतवांडी पोलीस स्टेशन गुन्हा रजिनंबर33/2020 भा.द.वी. 379प्रमाणे
8. येरवडा पोलीस स्टेशन गुन्हा रजिनंबर833/2019 भा.द.वी. 379प्रमाणे

सदर आरोपी यास पुढील तपासकामी तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.
सदरची कामगिरी ही पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त मा.श्री संदिप बिष्णोई, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उपआयुक्त गुन्हे मा.श्री सुधिर हिरेमठ, सहा पोलीस आयुक्त गुन्हे मा.श्री राजाराम पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा युनिट 5 पिंपरी चिंचवडचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.बाळकृष्ण सावंत, सहा पोलीस निरीक्षक श्री. राम गोमारे व पोलीस कर्मचारी श्यामसुदंर गुट्टे, फारुक मुल्ला, नितिन बहिरट, राजकुमार इघारे, भरत माने, धनंजय भोसले, दत्तात्रय बनसुडे, धनराज किरनाळे, स्वामीनाथ जाधव, दयानंद खेडकर, गोपाळ ब्राम्हंदे, संदिप ठाकरे, मयुर वाडकर, सावन राठोड, ज्ञानेश्वर गाडेकर, गणेश मालुसरे

यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक

(बाळकृष्ण सावंत)

गुन्हे शाखा युनिट 5 पिं.चि